दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com    संपादक : अजय भांगे    https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | रविवार दि.५ एप्रिल २०२६ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक २१७ | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Sunday 5 April 2026 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 217 | Pages 4 | Rate 4 Rs







# मोठे मन दाखवण्याची मागणी काँग्रेसने फेटाळली

# सुनेत्रा पवारांविरोधात उमेदवार देणारच

## प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी स्पष्ट केली भूमिका

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई (वृत्तसंस्था)**

बारामती विधानसभा पोटनिवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांच्या विरोधात उमेदवारी देण्याबाबत काँग्रेस पक्ष ठाम असल्याचे पक्षाचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी स्पष्ट केले आहे. या आधी पक्षाची जी भूमिका होती, त्याच भूमिकेवर काँग्रेस पक्ष ठाम असल्याचे देखील त्यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितले.वास्तविक या संदर्भात भारतीय जनता पक्षाच्या वतीने तसेच अजित पवार यांच्या पक्षाच्या वतीने ही निवडणूक बिनविरोध करण्याची मागणी करण्यात आली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील ही निवडणूक बिनविरोध करण्याची मागणी केली होती. मात्र तरी देखील काँग्रेस पक्षाची भूमिका ठाम असल्याचे सपकाळ यांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे सुनेत्रा पवार यांच्या विरोधात काँग्रेस उमेदवार देणार, हे जवळपास निश्चित मानले जात आहे.

बारामती विधानसभा पोटनिवडणूक संदर्भात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शशिकांत शिंदे यांना आमची भावना कळवली असल्याचे हर्षवर्धन सपकाळ यांनी सांगितले. यासंदर्भात चर्चा जरी सुरू असली तरी पक्षाने दोन्ही ठिकाणी उमेदवारांची चाचपणी केलेली आहे. उद्यापर्यंत उमेदवाराच नाव काँग्रेस पक्षाच्या वतीने अंतिम करणार असल्याचं हर्षवर्धन सपकाळ सांगितले आहे. या पोटनिवडणूक संदर्भाची जी भूमिका होती त्या भूमिकेवर काँग्रेस पक्षात ठाम आहे. या संदर्भात राज्यस्तरावर तसेच राष्ट्रीय स्तरावर देखील सर्व नेत्यांशी चर्चा झाली असल्याचे सपकाळ यांनी सांगितलं. त्यामुळे या संदर्भात उद्या दुपारपर्यंत निर्णय घेतला जाईल, असे देखील ते म्हणाले.



### मन मोठे करून पाठिंबा दिला पाहिजे:फडणवीसांचे आवाहन

**या संदर्भात माध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, सर्वच पक्षांनी सुनेत्रा ताईंना पाठिंबा दिला पाहिजे. माझी अशी सर्वांना विनंती असेल की, ही पोटनिवडणूक बिनविरोध झाली तर महाराष्ट्राला साजेशी अशा पद्धतीने परिस्थित होईल. यापूर्वी अनेक वेळा महाराष्ट्राने बिनविरोध पोटनिवडणूक केलेली आहे. मला आठवतं की, ज्या वेळेस आर. आर. आबांचे दु:खद निधन झालं होतं. त्यावेळी आपण पोटनिवडणूक बिनविरोध केली होती. भाजपने ठरवले होते की, निवडणूक लढणार नाही. त्यामुळे सर्वच पक्षांनी मन मोठे करून बिनविरोध निवडणूक करायला हवी, असे देखील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.**

## श्री विठ्ठल बिरुदेवाच्या नावाने चांगभलंच्या जय घोषात बोरगाव बुद्रुक येथे चैत्र पौर्णिमा यात्रा उत्साहात साजरी

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील श्री क्षेत्र बोरगाव बुद्रुक येथे चैत्र पौर्णिमा निमित्ताने उभ्या महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्री विठ्ठल बिरुदेवाची यात्रा दि.२ एप्रिल रोजी मोठ्या उत्साहात रोकडुबा देवाच्या समाधीस्थळी संपन्न झाली.



अठरा पगड जाती आणि बाराबलुतेदार आपापल्या लोकदैवतांच्या व कुल दैवतांच्या नावे मनोभावे पूजाअर्चा करून आपल्या भावनांना वाट मोकळी करून दिली. वर्षानुवर्षे या लोकपरंपरे तून व यात्रा उत्सवातून सर्वगुण संपन्नतेतून नटलेल्या सांस्कृतिक वैभवाचे जतन व सामाजिक दर्शन या उपक्रमातून दाखवून दिले जाते.जातीय व्यवस्थेशी सलग्न पारंपरिक ओव्या, नृत्ये,ढोल ताशांच्या गजरात निघालेली ही यात्रा म्हणजेच आपले सांस्कृतिक वैभव आहे याच परंपरेचा भाग म्हणून काढली जाणारी परज हि धनगर समाज बांधवांची खरी व अस्सल ओळख आहे.मौजे बोरगांव बुद्रुक येथे चैत्र पौर्णिमेनिमित्त आयोजित यात्रा उत्सवात श्री विठ्ठल बिरूदेवाची मानाची परज श्री.बिरुदेव कस्पटे या देवाने तर मानाची येत सौरभ घोडके यांनी घेतली.श्री विठ्ठल बिरुदेव ढोलकरी मंडळ नायगांव यांच्या कडुन श्याम घोडके,विकास घोडके, म्हाळाप्पा होदाडे,बिरू होदाडे,बिरू कस्पटे, कशिलिंग हिंगले,दादा होदाडे,सुरेश अण्णा, अमोल होदाडे,बिरुदेव भूतकर व सीताराम निंगुळे यांनी ढोलाच्या गजरात अवघा परिसर दुमदुमून टाकला.ही यात्रा यशस्वीरित्या पार पाडण्याकरिता खंडोबा देवाचे पुजारी गोपाळ देव निंगुळे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले तसेच श्री.सोमनाथ निंगुळे,श्री. नवनाथ अप्पा गाते,श्री. लक्ष्मण होळकर, सोमनाथ ढोरमारे, बिरुदेव भूतकर यांच्या आशीर्वादाने व बाळकृष्ण निंगुळे,पवन बोराडे,गणेश गुरव, निखिल मुसळे,श्री.विष्णु निंगुळे,सीताराम निंगुळे यांनी कार्यक्रमाची धुरा यशस्वीरित्या पार पाडली श्री.तुकाराम बापू फाटक यांनी महाप्रसादाची धुरा सांभाळली.दीपक होळकर व ड.उत्तरेश्र्वर निंगुळे यांनी या यात्रा सोहळ्याची रूपरेषा आखून रोकडुबा देवाचे वंशज नातू श्री.समाधान गाते यांच्या शिस्तबद्ध नियोजनाने सदरील यात्रा भंडारा उत्सव समाजाला कसलाही प्रकारचा आर्थिक स्वरूपात भार न पडता उत्साहात संपन्न झाला.बोरगाव बुद्रुक येथील विठ्ठल बिरुदेव यात्रा पंचक्रोशीतील भाविक भक्तांसाठी आनंददायी अनुभव देणारी ठरली अशी प्रतिक्रिया भाविक भक्तांनी व्यक्त केली आहे

## केज उपजिल्हा रुग्णालयात स्वच्छता अभियान संपन्न; महिन्याच्या पहिल्या शनिवारी राबवला जातो उपक्रम

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

केज शहरापासून जवळच असलेल्या उपजिल्हा रुग्णालयात महिन्यातील पहिला शनिवारी या स्वच्छता अभियान मोहीमे अंतर्गत परिसराची स्वच्छता करण्यात आली. उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. दत्तात्रय केंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली उप जिल्हा रुग्णालय परिसर स्वच्छता अभियान राबविण्यात आले. स्वच्छता अभियानात मेट्रन श्रीमती पळशीकर, श्रीकृष्ण नागरगोजे, श्रीमती गवळी,श्रीमती जोगदंड,श्रीमती भोपळे, श्रीमती साळवे,श्रीमती चव्हाण,श्रीमती गायकवाड,श्रीमती घुले, श्रीमती गिरी,श्रीमती पौळ,श्रीमती कराड, श्रीमती किवटे,श्रीमती सोनवणे,नासेर अली,श्री माळी यांच्यासह आरोग्य कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदवून रुग्णालय परिसर व उद्यान स्वच्छ केले. तेथील कचरा एकत्रित करून



कचरा व्यवस्थापन करण्यात आले.राबविण्यात आलेल्या स्वच्छता अभियानामुळे परिसर स्वच्छ व सुंदर झाला आहे.या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## केज येथे शिवसेना संपर्क कार्यालयाचे मान्यवरांच्या उपस्थितीत उद्घाटन,आगामी निवडणुकीत शिवसेना प्रभावीपणे उतरणार -संपर्कप्रमुख मनोज शिंदे

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

केज तालुका शिवसेना संपर्क कार्यालयाचा शुभारंभ व विविध गावात शिवसेना शाखा स्थापना कार्यक्रम संपर्कप्रमुख मनोजजी शिंदे, मराठवाडा सचिव अशोक पटवर्धन साहेब, उपनेत्या सौ.संगीताताई ठोंबरे,जिल्हा प्रमुख सचिन मुळुक यांच्या शुभ हस्ते करण्यात आला. यावेळी त्यांच्या समवेत उपस्थित जिल्हा संघटक योगेश नवले,तालुका प्रमुख पृथ्वीराज पाटील, विधानसभा प्रमुख दादासाहेब ससाणे,युवा सेना तालुकाप्रमुख दत्तकुमार काकडे, चंद्रशेखर बाप्पा मुकदम ज्येष्ठ नेते,अभिमान बापू पटाईत ज्येष्ठनेते,मालोजी नाना गलांडे,आदित्य रांजणकर शेतकरी सेना जिल्हा कार्याध्यक्ष बीड, सौ.जयाताई राऊत तालुकाप्रमुख महिला आघाडी, सौ.वैशालीताई सांगळे शहरप्रमुख महिला आघाडी, आम्रपाली गजेशिव, विकास काशीद शिवसेना तालुका सचिव,महेंद्र चाटे



उप तालुकाप्रमुख,योगेश देशमुख उपतालुकाप्रमुख कैलास उगलमुगले उप तालुकाप्रमुख,दादा पटाईत तालुकाप्रमुख, सुग्रीव बसवर उपतालुका प्रमुख,ज्ञानेश्वर भांगे युवा सेना उप तालुकाप्रमुख, शिवाजी गायकवाड युवासेना उप तालुका प्रमुख,किशोर थोरात माजी सरपंच कुंबेफळ, अशोक सक्राते,सुनील पटाईत,शुभम आप्पा गंभीरे,श्रीराम कदम, शिवशंकर पाटील साबला,जफरभाई हरणमारे,अमोल वळसे पाटील,ज्येष्ठ नेते प्रकाश गुंड,संजय गायके, दत्तात्रय सूर्यवंशी,विश्वास जाधव,राजेभाऊ जाधव, पृथ्वीराज इंगळे,दिलदार सिंग गोके,जालिंदर सिंग गोके,किसन दादा कदम, अशोकराव साखरे,अंगद वाघमारे,सुशील भाऊ रोकडे,प्रशांत कदम, सतीश कदम,बालाजी जाधव,दिनकर नेहरकर, अड.प्रदीप इतापे,अड. दिनकर सपाटे,मुन्ना धनवडे,प्रकाश खरात, कृष्णा कोल्हे,गव्हाणे तसेच शिवसेनेचे सर्व पदाधिकारी व शिव सैनिक यावेळी उपस्थित होते.आगामी निवडणूक शिवसेना ताकतीने लढणार असल्याचे यावेळी संपर्क प्रमुख मनोज जी शिंदे यांनी यावेळी बोलताना सांगितले.

## ग्रामपंचायत सदस्य मिनाज पटेल व देविदास जोगदंड यांनी स्वखर्चाने टँकरने पाणीपुरवठा

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील सोनिजवळा येथील रमेशराव आडसकर यांचे कट्टर समर्थक तथा ग्रामपंचायत सदस्य मिनाज पटेल व देविदास जोगदंड यांनी स्वखर्चाने गावातील नागरिकांसाठी मोफत टँकरने पाणी पुरवठा सुरू केला आहे

या बाबत सविस्तर वृत्त असे की सोनिजवळा येथे गेल्या ३० वर्षांपासून धनेगाव पाणी पुरवठा करणारी योजना सुरू होती परंतु त्या योजनेला बराचसा कालावधी झाल्याने ती पाइपलाइन जिर्ण झाली आहे त्यामुळे पाणी पुरवठा सुरळीत होत नाही. शासनाने जलजिवन मिशन योजने अंतर्गत जवळबंन येथील जलकुंभातुन सोनिजवळा गावांसाठी ४ कोटी १३ लाख रुपये किंमतीची योजना २०२३ मध्ये मंजूर करण्यात आली होती व त्यां योजनेचा कालावधी १८ महीने होता .परंतु गुत्तेदार व संबंधित जलजिवन योजनेच्या अधिकार्याच्या हलगर्जीपणामुळे आज पर्यंत गावाला पाणीपुरवठा सुरळीत झाला नाही म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार




पक्षाचे नेते रमेशराव आडसकर यांच्या शिलेदारांनी गावातील महिला , वयोवृद्ध व्यक्तींना २-२ किलोमीटर अंतरावरून पाणी आणावे लागत होते हि बाब लक्षात घेऊन. ग्रामपंचायत सदस्य मिनाज पटेल व देविदास जोगदंड यांनी सामाजिक बांधिलकीचे भान ठेवून आपण या समाजाचे देणे लागतो हि भावना मनात ठेवून दिवस रात्र प्रत्येक गल्लीत मोफत पाणी वाटप करणार आहेत आसे बोलताना सांगितले. रानात वस्तीवर राहणाऱ्या नागरिकांना पिण्याच्या पाण्याची टंचाई नसली तरी गावात मात्र नागरिकांचे पाण्या वाचुन हाल होत आहेत, वेळेत जलजिवन मिशन योजना पुर्ण झाली असती तर टँकरने पाणीपुरवठा करण्याची वेळ आली नसती. ५.५ हजार लीटर क्षमतेच्या टँकरमार्फत दररोज प्रत्येक गल्लीत मोफत हजारो लीटर पाणी वाटप करण्यात येणार असल्याचे मिनाज पटेल व देविदास जोगदंड यांनी सांगितले. या टँकरने उद्घाटन माजी सरपंच रत्नाकर भांडवलकर यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी तंटा मुक्ती अध्यक्ष शंकर ससाणे, से स सो संचालक सुनील ससाणे, अर्जुन इंगळे, लहू बोबडे, मा ग्रा. प. सदस्य वैजेनाथ सासणे, सुबराव जोगदंड बाबूखा पठाण, सत्तार शेख मौलाना, दादासाहेब इंगळे, शिरू वैरागे व गावातील नागरीकांच्या हास्ते नारळ फोडुन उद्घाटन करण्यात आले.

# संपादकीय

## बेमोसमीचा तडाखा



अमेरिका-इस्रायल विरुद्ध इराण यांच्यातील लांबलेल्या युद्धामुळे सगळ्यांनाच अडचणींना तोंड द्यावे लागत असताना, बेमोसमी पावसानेही अचानक हल्ला केल्याने शेतकऱ्यांसह सामान्यही चिंताक्रांत होणे साहजिकच. असे संकट शेतीपुरते कधी नसतेच. कृषीआधारित अर्थव्यवस्थेतील प्रत्येक घटकालाच त्याची किंमत मोजावी लागते. हवामान विभागाने या अवकाळी सरींचा इशारा आधीच दिला खरा; परंतु त्या इतक्या विक्रमी स्वरूपात कोसळतील, असे कुणाच्या ध्यानीमनी नव्हते.गेले दोन-तीन दिवस पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा, कोकण असा कोणताच भाग या तडाख्यातून सुटू शकला नाही. तशी मार्चच्या मध्यापासूनच राज्याच्या कोणत्या ना कोणत्या भागात पाऊस व गारपीट सुरू होती. मात्र, त्याच्या विक्रमाने पुणे-नाशिकसारखी शहरे ऐन उन्हाळ्यात तुंबवली. तेथील जनजीवन झोडपून काढल्यानंतर या संकटाच्या तीव्रतेचा अंदाज अनेकांना आला. पुण्यात एप्रिलमधील कोसळधारेचा १३० वर्षांचा विक्रम काही तासांत मोडीत निघाला, तर नाशिकमध्ये दोन तासांत ४० मिलीमीटर पाऊस झाल्याने खोदून पडलेल्या शहरातून मार्गक्रमण करताना नागरिकांची धांदल उडाली. या आपत्तीने सर्वाधिक होरपळ झाली शेतशिवाराची. राज्यात सुमारे सव्वा लाख हेक्टरवर शेतपिकांचे नुकसान झाल्याचे सरकारी आकडेवारी सांगते.प्रत्यक्षात या दोन दिवसांतील हानीची गणती अद्याप बाकी असल्याने हा आकडा अडीच लाख हेक्टरच्याही पुढे जाईल. आंबा, केळी, द्राक्ष, कांदा, हरभरा, गहू, संत्री, उन्हाळी भाजीपाला अशी हरेक पिके पावसाच्या तावडीत सापडून शेतकऱ्याची स्वप्नेच धुळीस मिळाली, ज्याचे परिणाम काहींच दिवसांत टंचाई, महागाईच्या स्वरूपात दिसतील.दुर्दैवाने भारतात तेवढे गांभीर्य दिसत नाही. हवामानाचे लाल-पिवळे 'लर्ट' मिळत असले तरी त्यांच्या अचूकतेचा मुद्दा आहेच. वास्तविक शेती व शेतकरी जितका लवकर संकटांतून बाहेर पडणे प्रत्येकाच्या हिताचे आहे, याची खूणगाठ बांधून आवश्यक ती बांधबंदिस्ती करायला हवी. रास्त दर, सोयी-सवलती, नुकसानभरपाई आदी गरजेचे आहेच; परंतु त्या जोडीला आधुनिक तंत्रज्ञानाच्या साथीने अस्मानी संकटांची तीव्रता नक्कीच कमी करता येऊ शकते. परंतु, त्यासाठी आधी राज्यकर्त्यांची तीव्र इच्छाशक्ती आणि प्रामाणिक प्रयत्न दिसणे सर्वांत महत्त्वाचे.

# ऑर्थोपेडिक डॉक्टरांच्या कमतरतेमुळे विक्रोळीतील महात्मा फुले रुग्णालयात रुग्णांची गैरसोय

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

विक्रोळी कन्नमवार नगर येथील मुंबई महानगरपालिकेच्या क्रांतिज्योती महात्मा फुले सर्वसाधारण रुग्णालयात ऑर्थोपेडिक (अस्थिरोग) डॉक्टरांच्या कमतरतेमुळे रुग्णांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असल्याची बाब समोर आली आहे.डॉ. योगेश भालेराव यांच्यासह दिशा वेल्फेअर ग्रुप आणि विक्रोळी विकास मंचच्या पदाधिकाऱ्यांनी रुग्णालयाचे डीन डॉ. जाधव यांची भेट घेऊन सद्य परिस्थितीचा आढावा घेतला. यावेळी ऑर्थोपेडिक विभागातील एका डॉक्टरांनी नुकतेच राजीनामा दिल्याने सध्या केवळ एकच डॉक्टर उपलब्ध असल्याची माहिती देण्यात आली. दुसऱ्या डॉक्टरांच्या नियुक्तीसंदर्भात प्रक्रिया सुरू असल्याचेही सांगण्यात आले. डॉ. जाधव यांनी स्पष्ट केले की, महानगरपालिकेच्या धोरणानुसार डॉक्टरांची भरती ही कंत्राटी (Contract) पद्धतीने केली जाते. मोठ्या



रुग्णालयांमध्ये मेडिकल कॉलेज व प्राध्यापक उपलब्ध असल्याने सेवा सुरळीत चालते; मात्र छोट्या रुग्णालयांमध्ये डॉक्टरांची कमतरता भासल्यास रुग्णांना त्रास सहन करावा लागतो.तसेच, महानगरपालिका वर्षातून केवळ एकदाच सीएमएस (CMS )मार्फत कंत्राटी डॉक्टरांची भरती करते. त्या वेळी डॉक्टरांना आपल्या पसंतीचे रुग्णालय निवडण्याची मुभा असल्याने अनेक डॉक्टर सोयीस्कर ठिकाणे निवडतात, परिणामी काही रुग्णालयांमध्ये पदे रिक्त राहतात.दरम्यान, रुग्णालयात नूतनीकरणानंतर अत्याधुनिक आयसीयू तयार असूनही डॉक्टरांच्या अभावामुळे ते सुरू करता येत नसल्याची खंतही व्यक्त करण्यात आली. क्रिकेट खेळण्यासाठी बॅट-बॉल आहे, पण खेळाडू नाहीत, अशी परिस्थिती असल्याचे उदाहरण यावेळी देण्यात आले.याशिवाय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रस्तुतीगृह येथे सोनोग्राफी मशीन उपलब्ध नसून ते मिळण्यासाठी साधारणतः एक वर्षाचा कालावधी लागणार असल्याची माहिती समोर आली आहे. तोपर्यंत नागरिकांना अन्य ठिकाणी जावे लागणार असल्याने त्यांची फरफट होण्याची शक्यता आहे.या पार्श्वभूमीवर स्थानिक लोकप्रतिनिधींनी या प्रश्नाकडे तातडीने लक्ष देऊन रुग्णांना आवश्यक आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.या भेटीदरम्यान दिशा वेल्फेअर ग्रुपचे अध्यक्ष दिनेश बेरीशेट्टी, रविंद्र वाघमारे, जोहीब चुडावाला, राजन कोळी तसेच विक्रोळी विकास मंचचे अध्यक्ष संजय येवले, राजाराम राव, आयवन डिसोझा आदी उपस्थित होते.

# मराठी झी५ सादर करत आहे गाजलेली दमदार मराठी फिल्म-रुबाब

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

यंदा वर्षाच्या सुरुवातीला चित्रपटगृहातील प्रदर्शनादरम्यान प्रेक्षकांसमोर झळकल्यानंतर, रुबाब मराठी झी५ वरील डिजिटल प्रीमिअरद्वारे व्यापक प्रेक्षकांपर्यंत पोहोचण्यासाठी सज्ज आहे. रॉमान्स, ड्रामा आणि इमोशन्स यांचे मिश्रण असलेला हा चित्रपट अभिमान, नातेसंबंध आणि आपण कोण आहोत हे ठरवणाऱ्या निवडीमध्ये रुजलेली कथा घेऊन येतो. आपल्या हृदयात, रुबाब ही कलाकृती सूरज आणि वैशालीच्या प्रवासाचे अनुसरण करतो. दोन प्रबळ इच्छाशक्ती असलेल्या व्यक्तींचे जीवन प्रेमाद्वारे एकत्र येते. परंतु परिस्थिती आणि स्वतःच्या भावनेची चाचणी घेतली जाते. त्यांचे नाते जसजसे विकसित होत जाते, तसतसा अभिमान, अहंकार आणि भावना मानवी संबंधांना कसे बळकट आणि आव्हान देऊ शकतात याचा शोध हा चित्रपट घेतो. प्रणय, ॲक्शन आणि भावनिक क्षणांची सरमिसळ असलेल्या रुबाबमध्ये आत्मसन्मान आणि ओळखीचे महत्त्व प्रतिबिंबित करताना नातेसंबंधांचे चढ-उतार टिपले जातात. संभाजी ससाणे, शीतल पाटील, विशाल शिरतोडे, अभिजीत साकते आणि सिमरन खेडकर यांच्या अभिनयासह या चित्रपटाला त्याच्या आकर्षक कथा आणि अभिनयासाठी चित्रपटगृहांमध्ये प्रशंसा मिळाली. त्याच्या डिजिटल प्रीमिअरद्वारे, रुबाब आता जगभरातील प्रेक्षकांपर्यंत पोहोचण्यासाठी सज्ज आहे. मराठी कथाकथनास एका व्यापक व्यासपीठावर आणत आहे.झी५ वरील डिजिटल प्रीमिअरबद्दल बोलताना, झी मराठीच्या चीफ चॅनल ऑफिसर आणि मराठी झी५ च्या बिझनेस हेड हेमा व्ही. आर. म्हणाल्या, रुबाब ही नात्यांची खरोखरच एक हृदयस्पर्शी कथा आहे - ही कथा आहे आपल्यासोबत नेहमी असणाऱ्या




आत्मसन्मानाची, आपण जपलेल्या प्रेमाची आणि स्व'ला आकार देणाऱ्या भावनांची. सांस्कृतिक पार्श्वभूमीवर आधारित चित्रपटाची कथा आपलीशी आणि घराच्या जवळची वाटते. मराठी चित्रपटाला परिभाषित करणारा प्रामाणिकपणा आणि अस्सलता यात प्रतिबिंबित होते. तसेच मराठी झी५ च्या माध्यमातून प्रेक्षकांसमोर ही शक्तिशाली कथा उलगडल्याबद्दल आम्हाला अभिमान वाटतो.दिग्दर्शक शेखर बापू रणखांबे म्हणाले, रुबाब ही प्रेम, आत्मसन्मान, भावना आणि अहंकाराची टक्कर झाल्यावर लोक करतात त्या निवडीविषयीची कथा आहे. ही एक कथा अतिशय वास्तविक वातावरणातून उत्पन्न झालेली असून प्रेक्षकांना चित्रपटगृहांमध्ये आपलीशी वाटली, हे विशेष आहे. हा चित्रपट आता मराठी झी५ वर अधिकाधिक प्रेक्षकांपर्यंत पोहोचेल याचा मला आनंद वाटतो. संभाजी सासणे पुढे म्हणाले, सूरजची भूमिका साकारणे हा एक अतिशय मनोरंजक अनुभव होता. कारण त्यात आत्मविश्वास आणि असुरक्षितता दोन्ही आहेत. ही कथा अनेक लोकांच्या भावना प्रतिबिंबित करते आणि मला आनंद आहे की जागतिक स्तरावरील प्रेक्षकांना आता मराठी झी५ वर रुबाब पाहण्याची संधी मिळेल. आम्ही त्याची आतुरतेने वाट पाहत आहोत.शीतल पाटील म्हणाली, वैशाली ही एक मजबूत आणि स्वतंत्र व्यक्तिरेखा असून तिच्या भूमिकेवर ठाम आहे आणि म्हणूनच मी या भूमिकेकडे आकर्षित झाले. रुबाब नातेसंबंधांमधील भावनिक पदर सुंदरपणे टिपतो. या प्रवासाचा एक भाग असणे खरोखरच विशेष आहे.रॉमान्स, ड्रामा आणि संबंधित कथाकथनाच्या मिश्रणासह, रुबाब सर्व वयोगटातील प्रेक्षकांसमोर गुंतवणाऱ्या कलाकृतीचे वचन देते.

रुबाब'चा डिजिटल प्रीमियर चुकवू नका, लवकरच केवळ मराठी झी५ वर!

# पोलिस मित्र सुरक्षा परिषद ऑफ इंडिया संघटनेच्या वतीने गुणवंतांचा समाजभूषण पुरस्काराने गौरव

दैनिक वादळ वार्ता
**कर्जत । प्रतिनिधी**

दर वर्षा प्रमाणेच या ही वर्षी आज दि ०३ मार्च २०२६ रोजी कर्जत येथील कार्यालयात पोलिस मित्र सुरक्षा परिषद ऑफ इंडिया नवी दिल्ली या संघटनेच्या वतीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गुणवंतांचा समाजभूषण पुरस्काराने गौरवण्यात आले.

आपल्या हातून समाजात अनेक चांगल्या गोष्टी घडत आहेत , अश्या मान्यवरांना आपल्या समाज कार्याची दखल घेऊन कर्जत येथील प्रदेश कार्यालय येथे समाज भूषण२०२६ पुरस्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी समाज भूषण पुरस्कार सचिन बुवा लोंगले यांनी मान्यवरांचे स्वागत केले व पुरस्कारकर्ते यांच्या कार्याची माहिती सांगून पुढील कार्यक्रम सुरू करण्यात आला.

या वेळी भजन, किर्तन, गायन, संगीत, विशारद, पवाडा, समाजसेवक. भावगीत भक्तीगीत, ढोलकी वादक, कलगीतुरा, हरिपाठ प्रवचन, समाज प्रबोधन, खालू बाजा सनई, पत्रकार या क्षेत्रातील विविध



मान्यवरांचा सत्कार पोलीस सुरक्षा परिषद ऑफ इंडिया नवी दिल्ली या संघटनेच्या वतीने यावर्षी २०२६ समाज भूषण पुरस्कार याने सन्मानित करण्यात आले.

यामध्ये १). तानाजी शंकर मसने (संगीत विशारद) मु तळवडे २) भास्कर शंकर मसने (मृदंग वादक तबला वादक)३) अमोल आत्माराम पाटील मु. पेझारी ,पोयनाड (भजनी गायक भावगीत भक्ती गीत)४) आकाश दत्तात्रय काटे मु.नेरल ( मृदुंग वादक तबला, ढोलकी वादक) ५) आशिष कमलाकर हातचागे . मु. खामदे, मुरुड जंजिरा. (संगीत विशारद ,भजन ,कलगीतुरा) ६) उद्देश धर्मा तलेकर. मु. मृतखार मुरुड.(वादक ढोलकी तबला खालुबाजा सनई) ७) नरेंद्र महाराज दादा पाटील मु.पिंपळोली कर्जत (किर्तन हरिपाठ प्रवचन समाज प्रबोधन )८) गणेश मारुती भोपी. मु.बदलापूर. (सामाजिक कार्यकर्ते समाजसुधारक)९) श्री अनिल तुकाराम गावडे .मु.वडाला मुंबई.(तबला ढोलकी विशारद) १०) जैतूबुवा गोपाल कराले. मु.बेकरे (भजन . संगीत समाजसेवक)११) जयेश जाधव संपादक कर्जत प्रभात मु.कर्जत.(प्रसिद्धी प्रमुख पत्रकार) १२) राहुल गायकवाड कर्जत पोलीस स्टेशन डी वाय एस पी.आदीघा समावेश होता. यावेळी अ पोलिस सुरक्षा परिषद ऑफ इंडिया नवी दिल्ली संघटनेचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष श्री डॉ. ज्ञानेश्वर सालोखे, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष श्री. किशोर शितोळे, प्रदेश कमिटी अध्यक्ष रतन लोंगले,ज्येष्ठ पत्रकार व आगरी समाज संघटना अध्यक्ष संतोष पेरणे, कर्जत लाईव्ह युट्यूब चैनल रायगड भूषण किशोर गायकवाड, जिल्हा युवक अध्यक्ष प्रफुल जाधव.पोलीस पाटील गणपत वाघमारे, समाजभूषण पुरस्कार सचिन बुवा लोंगले. त्याच प्रमाणे अनेक मान्यवर उपस्थित होते.

# धुनकवाडच्या मातीतलं प्रेम मनात कायमचं घर करून गेलं-नवनाथ बन



दैनिक वादळ वार्ता
**धारूर । प्रतिनिधी**

धारूर तालुक्यातील धुनकवाड येथे दिलेल्या भेटीदरम्यान ग्रामस्थांनी केलेल्या आत्मीय स्वागताने भारावून गेल्याची भावना भाजपाचे मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी व्यक्त केली आहे. बीड जिल्ह्यातील धुनकवाडच्या मातीत अनुभवलेलं प्रेम मनात कायमचं घर करून गेलं, असे त्यांनी आपल्या फेसबुक पोस्टद्वारे नमूद केले.

नवनाथ बन यांच्या धुनकवाड भेटीवेळी ग्रामस्थांनी मोठ्या उत्साहात व जल्लोषात त्यांचे स्वागत केले. गावात वाजत-गाजत मिरवणूक काढत फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली. धुनकवाड ग्रामपंचायत कार्यालयात त्यांच्या भेटीदरम्यान सरपंच भागवत गव्हाणे स्थानिक पदाधिकारी व ग्रामस्थांनी त्यांचा सत्कार केला.यानंतर सरपंच भागवत गव्हाणे यांच्या निवासस्थानी भेट दिली असता मातोश्रींनी पारंपरिक पद्धतीने औक्षण करून त्यांचे स्वागत केले. या स्नेहपूर्ण आणि आत्मीय आदरातिथ्यामुळे नवनाथ बन भावूक झाले.ग्रामस्थांच्या वतीने आयोजित कार्यक्रमात त्यांनी उपस्थितांशी संवाद साधत गावकऱ्यांच्या प्रेमाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. गावाच्या विकासासाठी सहकार्य करण्याची ग्वाहीही त्यांनी यावेळी दिली.या प्रसंगी भाजप प्रवक्ते राम कुलकर्णी, भाजपा सोशल मीडियाचे प्रदेशाध्यक्ष प्रकाश गाडे, सरपंच भागवत गव्हाणे यांच्यासह भाजप पदाधिकारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ताम्हाने परिसरात विद्यार्थिनींचा पाठलाग करून अश्लील कृत्य करणारा निघाला सरकारी कर्मचारी!

## देवरुख पंचायत समितीचा लिपिक पोलिसांच्या ताब्यात

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

संगमेश्वर तालुक्यातील मठधामापूर परिसरात संगणक वर्गासाठी जाणाऱ्या चार अल्पवयीन विद्यार्थिनींचा पाठलाग करून, त्यांच्यासमोर अश्लील कृत्य केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी देवरुख पोलिसांनी तत्परतेने कारवाई करत संशयित आरोपी हर्षल सुभाष गवंडी (वय २६, रा. पाटगाव) याला ताब्यात घेतले आहे. विशेष म्हणजे, संशयित आरोपी हा संगमेश्वर पंचायत समितीमध्ये लिपिक पदावर कार्यरत असल्याची माहिती समोर आली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, १ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ९:३० ते १०:०० च्या सुमारास ही घटना घडली. पीडित विद्यार्थिनी देवरुख येथील संगणक वर्ग संपवून एस.टी. बसने ताम्हाणे फाटा येथे उतरल्या होत्या. तेथून त्या पायी मठधामापूर गुरववाडीकडे जात असताना, पिवळ्या रंगाच्या दुचाकीवरून आलेल्या आरोपीने त्यांचा पाठलाग सुरू केला.मठधामापूर प्राथमिक आरोग्य केंद्राजवळ आरोपीने आपली दुचाकी थांबवून आधी विद्यार्थिनींची टेहळणी केली. त्यानंतर काही अंतरावर पुन्हा विद्यार्थिनींच्या




जवळ जाऊन चालत्या दुचाकीवर उभे राहून अश्लील कृत्य केले. या प्रकारामुळे घाबरलेल्या विद्यार्थिनींनी आरडाओरडा केला, मात्र तोपर्यंत आरोपी घटनास्थळावरून पसार झाला होता.या घटनेमुळे भयभीत झालेल्या विद्यार्थिनींनी घरी जाऊन पालकांना सर्व प्रकार सांगितला. त्यानंतर पालकांनी धीर देत २ एप्रिल रोजी देवरुख पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी भारतीय न्याय संहिता (BNS) कलम ७८, ७९ आणि बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण अधिनियम (POCSO) २०१२ च्या कलम १२ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.देवरुख पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक उदय झावरे या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत. आरोपी सरकारी कर्मचारी असल्याने या घटनेची परिसरात तीव्र चर्चा असून, महिला आणि मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

# अभिजित दरेकर यांना 'द ग्रेट पत्रकारिता आयकॉन अवॉर्ड' प्रदान

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

आई फाउंडेशन, रायगड (भारत) व महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, रायगड जिल्हा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित स्वराज्य भूमी रायगड गौरव संमेलन २०२६ हा भव्य सोहळा शुक्रवार दिनांक ३ एप्रिल २०२६ रोजी महाड तालुक्यातील नडगाव तर्फे बीरवाडी येथील हॉटेल फाउंटन इन (लिमोनेट लीला) येथे मोठ्या उत्साहात आणि दिमाखात पार पडला. कर्तृत्वाचा गौरव... रायगडचा अभिमान! या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या या संमेलनात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. यावेळी कर्जत येथील पत्रकार अभिजित नारायण दरेकर यांना 'द ग्रेट पत्रकारिता आयकॉन अवॉर्ड २०२६' प्रदान करण्यात आला. अभिजीत दरेकर यांनी पत्रकारिता क्षेत्रात प्रामाणिकपणे, निष्ठेने आणि धाडसाने केलेल्या कार्याची दखल घेत त्यांना



हा सन्मान देण्यात आला. ग्रामीण भागातील प्रश्न, सामाजिक समस्या आणि जनतेच्या अडचणी प्रभावीपणे मांडत त्यांनी पत्रकारितेत वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या या कार्याचा गौरव करत उपस्थित मान्यवरांनी त्यांचे कौतुक केले.या कार्यक्रमात मराठी चित्रपटसृष्टीतील अभिनेते अजय तपकिरे यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले. तसेच संमेलनाध्यक्ष म्हणून डॉ. विनोदराव मोरे यांनी मार्गदर्शन करताना समाजातील कर्तृत्ववान व्यक्तींना अशा प्रकारच्या व्यासपीठातून प्रेरणा मिळते, असे मत व्यक्त केले.कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना अभिवादन करून करण्यात आली. रायगडच्या ऐतिहासिक वारशाची परंपरा आणि स्वराज्य मूल्यांची जपणूक करत समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना गौरविण्याचा या संमेलनाचा उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले.या वेळी विविध क्षेत्रातील मान्यवर, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आ.मुनगंटीवार यांच्या पुढाकारातून मूल शहरात विकासाची गती

## रस्ते, नाल्या, समाजभवन ते कौशल्यविकास केंद्र,विविध कामांना वेग

## आ.मुनगंटीवार यांचे मुल वासियांकडून आभार; विकासकामांबद्दल कृतज्ञता व्यक्त

दैनिक वादळ वार्ता

**मूल । प्रतिनिधी**

बल्लारपूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार आदरणीय श्री. सुधीर मुनगंटीवार यांच्या मार्गदर्शनाखाली मूल नगर परिषद क्षेत्रात विविध विकासकामांना मोठ्या प्रमाणात गती मिळाली असून शहराच्या सर्वांगीण विकासासाठी अनेक कामे मंजूर झाली आहे. रस्ते व बंदिस्त नाल्यांचे जाळे उभारणे, समाजभवन व मल्टीपरपज हॉलसारखी सुविधा निर्माण करणे, कौशल्यविकास केंद्रांची उभारणी तसेच ओपन स्पेसचे सुशोभीकरण अशा विविध कामांमुळे मूल शहराचा चेहरामोहरा बदलणार आहे.मूल शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक निधी मंजूर करून घेण्यासाठी आ.मुनगंटीवार यांनी पुढाकार घेतला आणि त्यामध्ये मूल नगर परिषद क्षेत्रात प्रशांत पेदोजवार ते सरकारी बोडीपर्यंत सी.सी. रोड व बंदिस्त नाली, गिरडकर ते कटरे ते बट्टे यांच्या घरापर्यंत रस्ता, दुर्गा मंदिर परिसरातील नाली बांधकाम, वार्ड क्र. १५ मध्ये विवेक मांदाडे ते रवी समर्थ यांच्या घरापर्यंत रस्ता व नाली, तसेच एचडीएफसी बँक ते किशोर वेल्लावार यांच्या घरापर्यंत सी.सी. रोड व नालीची कामे सुरू आहेत. याशिवाय दिलीप रामटेके ते प्रमोद रामटेके, विवेक मुत्यालवार यांच्या घराजवळील रस्ते, तसेच रेस्ट हाऊस रोड ते प्रगती कॉम्प्युटर ते गोवर्धन यांच्या घरापर्यंत रस्त्यांचे बांधकाम करण्यात येत आहे.

शहरातील वार्ड क्र. ७ मध्ये कृष्णा गेडाम ते नामदेव डंकेवार यांचे घरापर्यंत रस्ता व नाली, इंदिरा नगर (वार्ड क्र. ८) मध्ये नागोसे वकील ते रमेश माहरपवार यांचे घरापर्यंत रस्ता, तसेच विविध भागांतील कामे हाती घेण्यात आली आहेत. पोस्ट ऑफिसजवळील महात्मा जोतीबा फुले चौकात स्टील रेलिंगचे बांधकामही करण्यात येत आहे.सामाजिक व सांस्कृतिक सुविधांच्या दृष्टीने वार्ड क्र. ३ मधील मोठा माळी मोहल्ल्यात समाजभवन उभारले जात असून संत जगनाडे महाराज सामाजिक सभागृहाचे बांधकामही प्रस्तावित आहे. मोजा मूल येथे मल्टीपरपज हॉल (इनडोअर गेम व सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी) उभारण्यात येत आहे. तसेच अंगणवाडी बांधकाम व विविध प्रभागांमध्ये ओपन स्पेस विकसित करण्याची कामेही प्रगतीपथावर आहेत.धार्मिक व सामाजिक स्थळांच्या सुशोभीकरणालाही प्राधान्य देण्यात आले असून बौद्ध विहार परिसरात संरक्षक भिंती व सौंदर्यीकरणाची कामे करण्यात येत आहेत. माता मंदिर ते राष्ट्रीय महामार्गपर्यंत सी.सी. नाली बांधकाम, तसेच शहरातील इतर भागांतील रस्ते व नाल्यांचे कामही सुरू आहे.पर्यावरण व स्वच्छतेच्या दृष्टीने मटन मार्केटमध्ये ईटीपी प्लांट उभारण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. याशिवाय नगर परिषद क्षेत्रात साई बाबा मंदिर, गणेश मंदिर परिसर तसेच हनुमान मंदिराजवळ कौशल्यविकास केंद्रांची उभारणी करून युवकांना रोजगाराभिमुख प्रशिक्षण देण्याचा महत्त्वपूर्ण उपक्रम राबविण्यात येत आहे.या सर्व विकासकामांच्या माध्यमातून मूल शहरात पायाभूत सुविधांची भक्कम उभारणी होत असून, नागरिकांच्या दैनंदिन जीवनात सकारात्मक बदल घडत आहेत. रस्ते, पाणी, आरोग्य, शिक्षण आणि इतर मूलभूत सेवांमध्ये झालेली ही लक्षणीय सुधारणा शहराच्या सर्वांगीण प्रगतीची साक्ष देत आहे. या परिवर्तनामागे सातत्याने विकासाचा ध्यास घेत काम करणारे आमदार श्री. सुधीरभाऊ मुनगंटीवार यांचे नेतृत्व ठळकपणे अधोरेखित होते. त्यांच्या दूरदृष्टीपूर्ण नियोजनामुळे आणि पाठपुराव्यामुळे मूल शहर विकासाच्या नव्या उंचीवर पोहोचत असून, मुलवासीय नागरीकांकडून आ.मुनगंटीवार यांचे आभार व्यक्त होत आहे.



## पळशी गट ग्रामपंचायत पाण्या मुळे महिला आक्रमक,ग्रामपंचायतवर गुंड मोर्चा काढून निषेध

दैनिक वादळ वार्ता

**मांडवी । प्रतिनिधी**

मांडवी:पळशी गट ग्रामपंचायत असुन खूप मोठे पाणी साठा असुन सुद्धा ग्रामपंचायतच्या नियोजनानसुन पळशी तांड्यावर भीषण पाणी टंचाई निर्माण झाली आहे महिलांनी ग्रामपंचायत येते आक्रमक भूमिका घेत पळशी ग्रामपंचायत कार्यालयावर समोर गुंड मोर्चा काढून निषेध करीत पाणीपुरवठा सुरळीत करण्याची मागणी करण्यात येत आहे



पळशी गट ग्रामपंचायत तालुका किनवट अंतर्गत पळशी, पळशी तांडा व लालू नाईक तांडा असे तीन गावाचा समावेश आहे पळशी व पळशी तांड्याला कणकी ग्रामपंचायत ची पाणी पुरवठा विहीर आहे भिलगाव येते पाणी पुरवठा करण्यात येते पळशी तांड्याला या नळ योजनेव्यतिरिक्त दुसरे कोणतेही पर्याय नाही

मागील काही दिवसापासून योग्य नियोजन अभावी पळशी तांड्यातील नागरिकांना तीव्र पाणीटंचाई समस्येला तोंड देत घडाभर पाण्यासाठी वन वन भटकावे लागत आहे पाणीटंचाईच्या समस्येला त्रासून अखेर महिलांनी दिनांक १ एप्रिल २०२६ रोजी ग्रामपंचायत कार्यालय पळशी वर गुंड मोर्चा काढून निषेध व्यक्त केला तांड्यावरील पाणीपुरवठा सुरळीत न केल्यास आमरण उपोषणास बसण्याचा इशाराही देण्यात आले येत्या दोन दिवसात पाणीपुरवठा सुरळीत करून देऊ असे आश्वासन ग्रामपंचायत अधिकारी टारपे यांनी दिल्याने महिला शांत झाल्या. यावेळी मांडवी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक गंगाधर गायकवाड यांनी बंदोबस लावले होते.

## स्पोर्ट्स कोट्यातून अमर येमलेची पोलीस दलात दमदार एन्ट्री!

## दयानंद वाणिज्य महाविद्यालयाचा विद्यार्थी नांदेड येथे पोलीस कॉन्स्टेबल पदावर नियुक्त

दैनिक वादळ वार्ता

**लातूर । प्रतिनिधी**

क्रीडा क्षेत्रातील सातत्यपूर्ण मेहनत, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर दयानंद वाणिज्य महाविद्यालयाचा विद्यार्थी अमर येमले याने मोठे यश संपादन केले आहे. स्पोर्ट्स कोट्यामधून त्याची नांदेड येथे पोलीस कॉन्स्टेबल पदावर नियुक्ती झाली असून, त्याच्या या यशाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.अमर येमले हा महाविद्यालयाचा क्रीडाप्रेमी व मेहनती विद्यार्थी असून, ॲथलेटिक्स क्षेत्रात त्याने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्याच्या या यशामुळे दयानंद वाणिज्य महाविद्यालयाच्या शैक्षणिक व क्रीडा परंपरेत आणखी एक मानाचा तुरा रोवला



गेला आहे. दयानंद वाणिज्य महाविद्यालयाने आजवर विविध क्षेत्रांमध्ये विद्यार्थ्यांचे करिअर घडविले असून, चार्टर्ड अकाउंटंट, प्रशासकीय अधिकारी तसेच यशस्वी उद्योजक घडविण्याची गौरवशाली परंपरा कायम ठेवली आहे. अमर येमलेचे यश हे त्याच परंपरेचे उत्कृष्ट उदाहरण ठरत आहे. या यशाबद्दल महाविद्यालयात शुक्रवारी विशेष सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले. प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर यांच्या हस्ते अमर येमलेचा सत्कार करण्यात आला. यावेळी उपप्राचार्य डॉ. गणेश लहाने, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बाळासाहेब चव्हाण तसेच क्रीडा विभाग प्रमुख डॉ. अशोक वाघमारे उपस्थित होते. अमर येमलेच्या यशामागे क्रीडा विभाग प्रमुख डॉ. अशोक वाघमारे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले असून, त्यांच्या मार्गदर्शनामुळेच अमरने हे यश संपादन केल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

## माहूर तालुका क्रीडा संकुलाचे भूमिपूजन

## किनवट माहूर तालुक्याचे आ.भीमराव केराम यांच्या हस्ते दोन एप्रिल ला भूमिपूजन सोहळा पार पडणार

दैनिक वादळ वार्ता

**श्रीक्षेत्र माहूर । प्रतिनिधी**

नांदेड क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत तालुका क्रीडा संकुल माहुरचा भुमीपुजन सोहळा आमदार भिमराव केराम विधानसभा सदस्य तथा अध्यक्ष तालुका क्रीडा संकुल समिती माहूर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे. याप्रसंगी तालुका क्रीडा संकुल समितीचे सन्माननिय सदस्य व स्थानिक लोकप्रतिनिधी व विविध दैनिकाचे प्रतिनिधी व विविध खेळातील खेळाडू यांच्या प्रमुख उपस्थितीत दि.०२ एप्रिल २०२६ रोजी दु. १.०० वा. तालुका क्रीडा संकुल मैदान पांडवलेनी शासकीय आदिवासी आश्रम शाळेजवळ माहूर येथे संपन्न होणार आहे.

तालुका क्रीडा संकुल, माहूर करीता गायरान गट क्रं. १९५ मधील क्षेत्र १ हेक्टर ४६ आर. शासकीय जागा प्राप्त आहे. सदर जागेवर क्रीडा सुविधेचे बांधकाम करणेकरीता रु ४९९.८८ लक्ष रक्कमेस प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. यामध्ये मल्टीपर्पज इनडोअर हॉल २०० मी. धावनपथ कबडडी खो-खो व्हॉलीबॉल मैदान सिमेंट रोड व इतर कामे संरक्षण भिंत वॉचमन रुम गेट व इतर पाण्याची व्यवस्था अग्नीशमक ड्रेनेज लाईन सेप्टी टँक बोरवेल व इतर अनुषंगीक कामे इत्यादी बाबीचा समावेश आहे.

सदर भुमीपूजन सोहळा संपन्न झाल्यानंतर लवकरच कामास सुरुवात करण्यात येणार असून तालुक्यातील खेळाडूंना राज्य व राष्ट्रीय दर्जाच्या अदयावत क्रीडा सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. या भुमीपूजन सोहळयास तालुक्यातील खेळाडू, पालक व क्रीडाप्रेमी, विविध संघटनेचे पदाधिकारी, अधिकारी-कर्मचारी यांनी मोठया संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन तालुका क्रीडा अधिकारी बालाजी शिरसीकर यांनी केले आहे.



## नळातून पिवळ्या पाण्याचा लातूरकरांना पुरवठा

### भाजपा नगरसेवकांनी घेतली तातडीची बैठक



दैनिक वादळ वार्ता

**लातूर । प्रतिनिधी**

लातूरकरानां नळातून पिवळ्या पाण्याचा पुरवठा होत असल्याची माहिती मिळताच प्रभाग क्रमांक १५ चे भाजपा नगरसेवक प्रवीण कस्तुरे व माजी नगरसेवक पुनीत पाटील यांनी तातडीची पाणीपुरवठा विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची तातडीची बैठक घेत उपायोजना करण्याच्या सूचना संबंधितांना दिल्या.

## नागरिकांच्या दीर्घ प्रतीक्षेला पूर्णविराम:अंबेवेस येथे नव्या पुलाच्या बांधकामास ज्येष्ठ नागरिक यांच्या हस्ते प्रारंभ

दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**

जुन्या गावभातील महत्त्वाचा वाहतूक दुवा असलेला पुल आता पुनर्निर्माण होणार आहे. अंबेवेस परिसरातील नागरिकांच्या अनेक वर्षांच्या मागणीला अखेर मूर्त स्वरूप प्राप्त झाले असून, नव्या पुलाच्या बांधकामाचा शुभारंभ आज या भागातील जेष्ठ नागरिक यांच्या हस्ते करण्यात आला. जनतेचे प्रतिनिधी म्हणून ज्येष्ठ नेते नारायणदेव गोपनपाळे यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून शुभारंभ झाला.जुन्या व अरुंद नळकांडी पुलामुळे नागरिकांना दररोज मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. विशेषतः पावसाळ्यात परिस्थिती अधिकच गंभीर होत असल्याने शालेय विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिला व शेतकरी यांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. नवीन, प्रशस्त व सुरक्षित पुलासाठी नागरिकांकडून सातत्याने मागणी होत होती. या मागणीची दखल घेत राज्याचे माजी मंत्री आ. धनंजय मुंडे तसेच राज्याच्या पर्यावरण व





पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या प्रयत्नांमुळे सन २०२५-२६ च्या वार्षिक जिल्हा योजना (DPDC) अंतर्गत या पुलासाठी १ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला.आज या पुलाच्या बांधकामाचा शुभारंभ या भागातील जेष्ठ व मान्यवर नागरिक यांच्या हस्ते श्रीफळ फोडून करण्यात आला. या कार्यक्रमास परिसरातील ज्येष्ठ नागरिकांसह अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रसंगी माजी नगराध्यक्ष बाजीराव धर्माधिकारी, नगर परिषद बांधकाम सभापती प्रा. पवन मुंडे, माजी उपनगराध्यक्ष तथा नगरसेवक राजाभैय्या पांडे, जयराज देशमुख, नितीन बागवाले आदी उपस्थित होते.दरम्यान, पुलाचे काम दर्जेदार व वेळेत पूर्ण व्हावे यासाठी प्रशासनाला सूचना देण्यात आल्या. तसेच कामात पारदर्शकता राखण्यासाठी पुलाचे थ्री-डी स्टील डिझाईन, मंजूर निधी व कामाचा कालावधी दर्शविणारा माहिती फलक उभारण्याचे निर्देशही नगर अभियंत्यांना देण्यात आले आहेत. नव्या पुलामुळे अंबेवेस परिसरातील वाहतूक अधिक सुरक्षित व सुलभ होणार असून, हा पूल विकासाचा नवा दुवा ठरणार असल्याची भावना नागरिकांकडून व्यक्त होत आहे.पुलाचे काम दर्जेदार व वेळेत पूर्ण व्हावे यासाठी नगर परिषद प्रयत्न करेल.अशी ग्वाही नगराध्यक्षा सौ पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी व सर्व न. प. पदाधिकारी यांनी दिली आहे.

**नागरिकांनी पर्यायी रस्त्यांचा वापर करण्याचे आवाहन**

दरम्यान अंबेवेस येथील पूलाला आता नवे रूप येणार असून नवीन पूलाच्या बांधकामासाठी या पुलावरून वाहतूक बंद राहणार आहे. त्यामुळे या पुलाच्या दोन्ही बाजूने असलेल्या पर्यायी रस्त्यांचा उपयोग नागरिकांनी बांधकाम पूर्ण होण्याच्या कालावधीत करावा व नगरपरिषदेला सहकार्य करावे असे आवाहन करण्यात आले आहे

दैनिक वादळ वार्ता

रविवार दि.५ एप्रिल २०२६

पान ०४

# केज येथील स्वच्छ,पारदर्शक कारभाराच्या बळावर कृष्णा अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेला ७५ लाखांचा नफा

## बँकेने १०० कोटींचा ऐतिहासिक टप्पा पार करत ६१ कोटींचे केले कर्ज वाटप

### विजयकांत मुंडेंचे मार्गदर्शन अन बँकेची उत्तुंग भरारी!

बीड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष विक्रम बप्पा मुंडे यांनी केज शहारात २८ वर्षांपूर्वी कृष्णा अर्बन को- ऑपरेटिव्ह बँकेची स्थापना केली होती. बँकेचे चेअरमन विजयकांत मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली बँकेने ग्राहकांचा विश्वास संपादीत करून स्वच्छ व पारदर्शक कारभार करत १०० कोटींचा ऐतिहासिक टप्पा पार केला आहे.तसेच बँकेला राज्य पातळीवर विविध पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

### बँकेचे चेअरमन विजयकांत मुंडे यांची माहिती



दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

केज शहरातील कृष्णा अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेने १०० कोटींचा टप्पा पार केला असून त्यापैकी बँकेने ६१ कोटींचे कर्ज वाटप केले आहे.२३ कोटी रूपये बँकने गुंतवणूक केली आहे.बँकेकडे सध्या ८ कोटींचा स्वनिधी आसून बँकेचा ग्रॉस एनपीए २.९८% तर निव्वळ एन पी.ए १.६४ % इतका आहे.दरम्यान बँकेला यावर्षी ७५ लाखांचा निव्वळ नफा झाला असून बँकेच्या केज, बीड,माजलगाव, नांदूरघाट,कळंब,शिरूर (का) येथे एकुण ६ शाखा कार्यरत आहेत.तसेच लवकरच बँकेच्या सर्व शाखेतून मोबाईल बँकिंग,यूपीआय,फोन पे,गुगल पे खातेदारांच्या सेवेत सुरू होणार आहे. दरम्यान हजारो सभासद, ठेवीदार आणी ग्राहकांनी दाखवलेल्या विश्वासाच्या बळावर बँकेने १०० कोटींचा ऐतिहासिक टप्पा सर केला असल्याची माहिती बँकेचे चेअरमन विजयकांत मुंडे यांनी दिली आहे.बीड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष विक्रम बप्पा मुंडे यांनी केज शहरात २८ वर्षांपूर्वी कृष्णा अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेची स्थापना केली होती. बँकेचे चेअरमन विजयकांत मुंडे यांच्या कूशल मार्गदर्शनाखाली स्वच्छ व पारदर्शक कारभाराच्या बळावर बँकेने अल्पावधीतच यशस्वी भरारी घेतली असून बँकेने १०० कोटींच्या पुढे वाटचाल केली आहे.बँकेला मागील कित्येक वर्षा पासून राज्य पातळीवर विविध पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.बँकेचे हितचिंतक, खातेदार,ठेवीदार, सभासद व ग्राहकांच्या विश्वासाच्या जोरावर बँकेला आर्थिक चालु वर्षात १०० कोटींच्या ठेवी प्राप्त झाल्या असून त्यापैकी ६० कोटींचे कर्ज वाटप केले आहे.या माध्यमातून बँकेच्या कर्जदारांना विविध व्यवसाय उभारून स्वताच्या पायावर उभे राहण्यासाठी मदत केली आहे.तर बँकेला चालु आर्थिक वर्षात ७५ लाखांचा निव्वळ नफा मिळाला आहे.बँकेचे व्हाईस चेअरमन चंद्रकांत कुलकर्णी,मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेवराव मुंडे,उपमुख्य कार्यकारी अधिकारी तानाजी जाधव,सर्व शाखेचे शाखा व्यवस्थापक,सर्व शाखेचे कर्मचारी उत्तम कर्तव्य बजावत असून लवकरच ग्राहकांच्या सेवेत बँक मोबाईल बँकिंग, यूपीआय,फोन पे,गुगल पे सुरू करत असून बँकेने १०० कोटींची ऐतिहासिक वाटचाल केल्याची माहिती बँकेचे चेअरमन विजयकांत मुंडे यांनी दिली आहे.

## ४० वर्षांचा अन्याय संपला! नेता नाही, बेटा आहे म्हणत सुरज पांडे यांची आक्रमक कामगिरी

दैनिक वादळ वार्ता

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

प्रभाग क्र. १० मधील बंगाली कॅम्प परिसरात तब्बल ४० वर्षांपासून पाणी, वीज आणि घरांच्या मूलभूत सुविधांपासून वंचित असलेल्या नागरिकांचा प्रश्न अखेर मार्गी लागला असून, संपूर्ण परिसरात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.वर्षानुवर्षे अनेक नगरसेवक आले, निवडणुका झाल्या, आश्वासने दिली गेली, मात्र हा ज्वलंत प्रश्न कायमच दुर्लक्षित राहिला. पण यंदा जनतेने सुरज पांडे यांच्यावर विश्वास ठेवत त्यांना प्रचंड बहुमताने निवडून दिले आणि याच विश्वासाला न्याय देत त्यांनी थेट कामाला सुरुवात केली.



निवडणुकीदरम्यान मी नेता नाही, तुमचा बेटा आहे असे म्हणत दिलेले आश्वासन त्यांनी कृतीत उतरवले. तुमच्या समस्या माझ्या समस्या आहेत आणि त्या सोडवणे ही माझी जबाबदारी आहे, या भूमिकेतून त्यांनी प्रशासनाकडे पाठपुरावा करत हा प्रश्न मार्गी लावला.

आज बंगाली कॅम्पमध्ये पाणी, वीज आणि निवाऱ्याच्या सुविधांचा मार्ग मोकळा झाल्याने नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण असून, अनेकांनी नगरसेवक पांडे यांचे आभार व्यक्त केले आहेत. जनतेच्या प्रश्नांसाठी आक्रमक भूमिका घेणारा लोकप्रतिनिधी कसा असावा, याचे उदाहरण म्हणजे सुरज पांडे, अशी चर्चा सध्या गडचांदूर शहरात रंगली आहे.

## वाचन संस्कृती जतन करणे ही काळाची गरज-डॉ.चंद्रसेन कोठावळे

दैनिक वादळ वार्ता

**पाचोड । प्रतिनिधी**

: येथील शिवछत्रपती कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय तथा मराठी विभागाच्या वतीने 'आंतरराष्ट्रीय बाल पुस्तक दिन' आणि 'छत्रपती राजश्री शाहू महाराज राज्याभिषेक दिन' उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात शाहू महाराजांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून करण्यात आली.या कार्यक्रमाला जि.प. शाळेचे मुख्याध्यापक रेवनसिंग शिखरे , सोनार सर, पाटील सर यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे होते. विशेष म्हणजे या उपक्रमासाठी जि.प. शाळेतील सुमारे १०० बालविद्यार्थ्यांना निमंत्रित करण्यात आले होते. प्रमुख पाहुणे मुख्याध्यापक शिखरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, पुस्तकं आपल्याला नवीन जग दाखवतात.विचार करायला शिकवतात. आणि चांगले संस्कार



घडवतात. म्हणून पुस्तकं हे आपले चांगले मित्र आहेत. महाविद्यालयाच्या वतीने उपस्थित विद्यार्थ्यांना विविध थोर व्यक्तिमत्त्वांच्या जीवनकथांवर आधारित प्रेरणादायी पुस्तकांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, हा मुख्य उद्देश होता.मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे यांनी सांगितले की, आजच्या आधुनिक युगात वाचन संस्कृती हळूहळू लोप पावत चालली आहे. मोबाईल आणि ऑनलाइन गेम्सच्या आहारी गेलेला विद्यार्थी वाचनापासून दूर जात आहे. ही परिस्थिती बदलण्यासाठी वाचन संस्कृतीचे जतन करणे अत्यंत गरजेचे आहे. विद्यार्थ्यांनी मैदानी खेळांना प्राधान्य द्यावे आणि पुस्तकांच्या सहवासातून आपले व्यक्तिमत्त्व घडवावे.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. विनोद कांबळे यांनी केले, तर आभार प्रा. संदीप सातोणकर यांनी मानले. याप्रसंगी महाविद्यालयातील उपप्राचार्य डॉ.शिवाजी यादव डॉ.सुभाष पोटभरे डॉ.सुरेश नलावडे डॉ.हेमंत कुमार जैन डॉ.तुकाराम गावंडे डॉ.उत्तम जाधव प्रा. सचिन कदम प्रा.नितीन चित्ते डॉ.विठ्ठल देखणे व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते

## चांदूरबाजार पाटबंधारे कार्यालयात कर्मचारी गायब! शेतकऱ्यांची कामे रखडली; प्रशासन झोपेत?

दैनिक वादळ वार्ता

**चांदूरबाजार । प्रतिनिधी**

उपविभागीय अभियंता, मध्यम व लघु पाटबंधारे विभाग क्रमांक ३, चांदूरबाजार येथील कार्यालयाचा भोंगळ कारभार पुन्हा एकदा समोर आला आहे. शासनाने ठरवून दिलेल्या वेळेत कार्यालय सुरू असतानाही येथे एकही कर्मचारी हजर नसल्याचे धक्कादायक वास्तव उघड झाले आहे.आमच्या प्रतिनिधींनी प्रत्यक्ष कार्यालयाला भेट दिली असता संपूर्ण कार्यालय ओस पडलेले आढळले. कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी उपस्थित नसल्याने कामानिमित्त आलेल्या शेतकरी व नागरिकांना निराश होऊन उलट्या पावली परत जावे लागले. परिणामी, शेतकऱ्यांची विविध कामे प्रलंबित राहून त्यांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. विशेष म्हणजे, संबंधित अधिकाऱ्यांवर वरिष्ठांचा कोणताही दबाव नसल्याने कार्यालयात मनमानी कारभार सुरू असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. शासनाचे नियम व वेळापत्रक अक्षरशः धाब्यावर



बसवण्यात आले असून प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे सर्वसामान्य नागरिकांचे हाल होत आहेत.या प्रकारामुळे संतप्त झालेल्या शेतकरी व नागरिकांनी जिल्हाधिकारी याकडे गांभीर्याने लक्ष देणार का? असा सवाल उपस्थित केला आहे. संबंधित विभागाच्या कारभाराची तातडीने चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे.

## तामसा येथील दुकानदाराची हदगावातील एका पत्रकार प्रतिनिधीवर कार्यवाही करण्याची धमकी

### तालुक्यातील पत्रकारांचे शिष्टमंडळ शासनाकडे चौकशी आणि कायदेशीर कार्यवाहीची मागणी करणार?

दैनिक वादळ वार्ता

**हदगांव । प्रतिनिधी**

हदगाव तालुक्यातील मोठी बाजारपेठ असलेल्या तामसा शहरातील एका किराणा दुकानदार किराणा दुकानाच्या आडोशाने गोवा, रजनीगंधा, विमल, मुसाफिर, ह्या शासनाने बंदी घातलेल्या सुगंधी गुटख्याची ठोक आणि किरकोळ विक्री व तस्करी करीत असल्याची चर्चा तामसा शहर आणि परिसरात होत असताना हदगाव येथील एका पत्रकार प्रतिनिधीने सदरील घुटका तस्करीची चर्चा हेरून आपल्या लोकप्रियदैनिकात गुटखा किंग तस्करी बद्दलचे (वृत्त) बातमी प्रकाशित केली सदरील खऱ्या बातमीचा राग मनात धरून दुकानदाराने ९५०३७५३८७२ ह्या मोबाईल क्रमांकावरून दिनांक १ एप्रिल २०२६ रोजी रात्री आठ वाजून दोन मिनिटांनी हादगाव येथील खरी बातमी प्रकाशित करणाऱ्या एका पत्रकार प्रतिनिधीच्या ९७६५६५६८७६ ह्या नंबरवर खोटी कारवाई करण्याची धमकी देऊन पत्रकार क्षेत्राची गळचेपी करण्याचा प्रयत्न केला असून सदरील दुकानदाराची चौकशी होऊन हदगाव तालुक्यातील पत्रकार प्रतिनिधीचे शिष्टमंडळ शासनाकडे कायदेशीर कार्यवाहीची मागणी करणार असल्याची चर्चा हादगाव तालुक्यातील पत्रकार प्रतिनिधी मध्ये जोर धरीत आहे.

## उन्हाची तीव्रता वाढल्याने माठांची विक्री वाढली

### माठांना मागणी; गरिबांचा फ्रिजही महागला

दैनिक वादळ वार्ता

**किनवट । प्रतिनिधी**

किनवट बाजार सध्या उन्हाची तीव्रता वाढल्याने गरीबांचा फ्रिज समजल्या जाणाऱ्या मातीचे माठ, मटके आणि रांजण बाजारात विक्रीसाठी दाखल झाले आहेत. गेल्या रविवारच्या आठवडी बाजार व आज शुक्रवार किनवट शहराच्या रस्त्यावर लहान-मोठ्या आकारांतील काळे, लाल माठ व रांजण विक्रीस आले आहेत.

फ्रिजरमध्ये थंड केलेल्या पाण्यापेक्षा मातीच्या



भांड्यातील पाणी आरोग्यासाठी गुणकारी असते. त्यामुळे आजही अनेक नागरिक मातीच्या भांड्यातील

पाण्याचा प्रामुख्याने वापर करतात. यावर्षी मार्च महिन्याच्या पहिल्याच आठवड्यापासून सूर्य आग ओकू लागला आहे. दिवसेंदिवस तापमानात वाढ होत आहे.

उन्हामुळे पारंपरिक मातीचे माठ, रांजण, यांना मागणी वाढली

आहे. किनवट शहरात माठ विक्रीसाठी विक्रेत दाखल दाखल झालेआहेत. ग्राहकांची या माठांना पसंतीदेखील असल्याचे दिसून येत आहे. माठासाठी लागणाऱ्या कच्च्या मालाच्या किंमतीत वाढ झाल्याचे माठ विक्रेत्यांनी सांगितले आहे.

### घाटशीळ पारगावहून बडेवाडीकडे दिमाखात मिरवणूक

## संत भगवानबाबा नारळी सप्ताहानिमित्त १० क्विंटल लाडूंची महापंगत उत्साहात

दैनिक वादळ वार्ता

**पाथर्डी । प्रतिनिधी**

घाटशीळ पारगाव ता. शिरूर कासार, जि. बीड येथील ग्रामस्थांच्या वतीने बडेवाडी येथे सुरू असलेल्या श्री संत भगवानबाबा नारळी सप्ताहानिमित्त आज दहा क्विंटल लाडूंची भव्य महापंगत मोठ्या उत्साहात पार पडली. यानिमित्त घाटशीळ पारगाव ते बडेवाडी अशी भव्य मिरवणूक काढण्यात आली असून हजारो ग्रामस्थांच्या उपस्थितीत हा सोहळा दिमाखात संपन्न झाला.सकाळपासूनच गावात धार्मिक उत्साहाचे वातावरण होते. पारंपरिक वाद्यांच्या गजरात, भगवे फेटे व दुपट्टे परिधान करून ग्रामस्थांनी मोठ्या श्रद्धेने सहभाग नोंदविला. मिरवणुकीदरम्यान जयघोष, ढोल-ताशांच्या निनादात वातावरण भक्तिमय झाले होते. ग्रामस्थांनी एकोप्याने आणि भक्तिभावाने लाडू तयार करून ते सप्ताहस्थळी अर्पण केले.बडेवाडी येथे पोहोचलेल्या मिरवणुकीचे मोठ्या जल्लोषात स्वागत करण्यात आले. बडेवाडी ग्रामस्थांच्या वतीने रामगिरी महाराज यांनी घाटशीळ पारगाव ग्रामस्थांचे भव्य स्वागत केले. यावेळी दोन्ही गावांतील ग्रामस्थांमध्ये उत्साहाचे आणि भक्तिभावाचे वातावरण पाहायला मिळाले.यानंतर संत भगवानबाबांच्या चरणी लाडूंचा नैवेद्य अर्पण करून महापंगतीचे आयोजन करण्यात आले. हजारो भाविकांनी या महापंगतीचा लाभ घेतला.या कार्यक्रमासाठी गावातील तरुण, ज्येष्ठ मंडळी तसेच महिला वर्गाने मोठ्या उत्साहाने परिश्रम घेतले. ग्रामस्थांच्या एकजुटीचे आणि भक्तिभावाचे दर्शन या सोहळ्यात घडून आले. हा सोहळा अधिक भव्यदिव्य व्हावा अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.या भव्य आयोजनामुळे परिसरात भक्तिमय आणि उत्सवी वातावरण निर्माण झाले असून संत भगवानबाबा नारळी सप्ताह अधिक रंगतदार ठरत आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077